क्र. ९२/३ल/इ-०९५

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
बी.केम.आर.डी.बे.इमारत १ला मजला
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रति,

दिनांक :- २८ एप्रिल, १९९१.

श्री.प्रकाश बाबूराव नामुळे .
बाळा कुवर बिल्डींग खेतवाडी
१२वी गल्ली तळमजला, मुंबई ४०० ००४.

विषय :- जमीन: मुंबई उपनगर जिल्हा

मौजे वर्सोवा येथील स.क्र.१६१ लगतची
खाडी जमीन अभिन्यास भाग वे मधील
भूखंड क्रमांक ७ माझगाव डॉक सहकारी
गृहनिर्माण संस्था...
सोडतीनुसार प्रदान करणे बाबत..

महाशय,

दिनांक २१.३.९१ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमध्ये आपली संस्था संस्था ६व्या क्रमांकावर यशस्वी झाली असून आपल्या संस्थेला मौजे वर्सोवा खाडी जमीन भाग वेच्या अभिन्यासातील भूखंड क्रमांक ७ क्षेत्र १६६५-२५ चौ.मी.अधिक रस्त्यात जाणाऱ्या जागेचे चटई क्षेत्र ११६.०९ चौ.मी. मिळून एकूण चटईक्षेत्र २२२१=११ चौ.मीटरचा संस्थेला लाभ मिळणार आहे. तरी आपण सदर जमिनीची तात्पुरता बाजारभाव रुपये ६०/-प्रती चौ.मी. दराने रक्कम रुपये १,१९,८०९=८० या कार्यालयात डिमांड ड्राफ्टने त्वरीत जमा करावी. व सदरचा तात्पुरता बाजारभाव व शासन अंतिमरित्या ठरविल तो बाजारभाव यामध्ये वाढ झाल्यास संस्था फरकाची रक्कम विहीत दराने व्याजासह शासनाला मागणी केल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत भरण्याबाबत संस्थेने रुपये १०/-च्या मुद्रांकित पेपरवर हमीपत्र या कार्यालयात सादर करावे.

संस्थेच्या सदस्यांना मंजुरी देणे, संस्था नोंदणीकृत करणे, करारनामा करणे इ.करीता आणखी काही कालावधी लागणार असल्यामुळे संस्था वरील भूखंडाला स्वखर्चाने कुंपण घालण्यास तयार असल्यास खालील नमुन्यात हमीपत्र

२.या.....

रुपये १०/-च्या मुद्रांकित पेपरवर या कार्यालयात सादर केल्यानंतर संस्थेला सदर भूखंडाला कुंपण घालण्यास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

"संस्था प्रश्नाधीन जमिनीवर कोणताही हक्क सांगणार नाही व शासनातर्फे संस्थेला जेव्हा कुंपण काढण्यास सांगण्यात येईल तेव्हा कोणतीही नुकसान भरपाई न मागता ते काढून घेण्यात येईल व कुंपण घालण्याचा व काढण्याचा खर्च पूर्णतया: संस्थेला करावा लागेल. या अटी मान्य व संस्थेवर बंधनकारक रहातील".

आपला विश्वासू

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

बीएमपत.

24/5/91

क्र.१२/१३/८-०९५.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
सी.के.एम.आर.डी.ए.इमारत ३रा मजला,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

दिनांक :- ९ मार्च,१९९२.

वाचा :- १) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दिनांक ७.९.९१.
२) संस्थेचे पत्र दि.२.१.९२.
३) उप निबंधक सहकारी संस्था (के/पश्चिम) यांचेकडील नोंदणीचे प्रमाणपत्र बी.ओ.एम./के डब्ल्यू/के डब्ल्यू/एचएसजी/टीसी/४०५१/सन ९१-९२ दिनांक ७.१२.९१.
४) करारनामा दिनांक १५/१/९२.

आदेश :-

मौजे वर्सोवा तहसिल अंधेरी मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्वे नं.१६१ लगतची सरकारी जमीन अभिन्यास भाग "ब" मधील भूखंड क्रमांक ७ क्षेत्र ११३५.२४चौ.मी. आणि रस्त्यात जाणा-या जागेचे घटई क्षेत्र ११९.०९ चौ.मी. (सक्षम निर्देशात) सोडतीनुसार गावगांव सहकारी गृहनिर्माण संस्थेला आता उपनिबंधक ~~सहकारी गृहनिर्माण संस्थेला आता उपनिबंधक~~ सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी झाल्यानुसार मनीषा सहकारी गृहनिर्माण संस्थेला त्यांनी तात्पुरती कब्जाहक्काची किंमत रुपये १,१९,८७९.८० (रुपये एक लाख एकोणचाळीस हजार आठशे एकूण [illegible] आणि पैसे ऐंशी मात्र) पावती क्र.१०२२५६ दि.४.६.९१ अन्वये भरणा केल्यामुळे सदर फरकाची रक्कम शासनाचे प्रचलित दराने व्याजासह भरण्याबाबत दिनांक ६.९.९१ रोजी रुपये १०/-चे मुद्रांकित पेपरवर हमीपत्र सादर केल्यामुळे सोबत जोडलेल्या जोडपत्र "एक" मधील मंजुर सदस्यांच्या सदनिका बांधण्याकरिता प्रदान करण्यात येत आहे.

सदर संस्था ही सहकारी संस्थेच्या कायद्यातील क्र.बीओएम/के डब्ल्यू/के डब्ल्यू/एचएसजी/टीसी-४०५१/सन-९१-९२ दिनांक ७.१२.९१ ने नोंदणीकृत झालेली आहे. सदर संस्थेने शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा केला असून संस्थेला सोबत जोडलेल्या "जोडपत्र दोन" व "जोडपत्र तीन" मध्ये नमूद केलेल्या विशिष्ठ अटी व शर्तींवर प्रदान करण्यात येत आहे.

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

श्री.रमेश के. सावंत,
सचिव,
मनीषा सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)
[illegible] नगर १ शिवडी (पश्चिम)मुंबई ४०० ०४३.
क्र.मा.का.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, जागेचा ताबा घेण्यासाठी त्यांनी जिल्हानिरीक्षक भूमी अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी, क्रमांक ४ चौथा चंदन अपार्टमेंट एस.व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई ४०० १०२ यांचेशी संपर्क साधावा.

प्रत:- करारनाम्याच्या प्रतीसह

१. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक ४ चौथा चंदन अपार्टमेंट एस.व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई ४०० १०२ यांचेकडे माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी प्रश्नाधिन भूखंडाचा ताबा सदर संस्थेच्या प्रतिनिधींना गावचे मंडळ निरीक्षक यांचे समक्ष द्यावा; तसेच जागा देणे संबंधीचा अहवाल ३ प्रतींमध्ये नकाशा व ताबे पावतीसह ८ दिवसात सादर करावा.

२. तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहितीकरिता रवाना.

२/- त्यांनी संबंधीत मंडळ निरीक्षक यांना प्रश्नाधिन जमिनीचा ताबा देतांना जागेवर हजर रहाण्याच्या सूचना द्याव्यात व ताबा दिल्यानंतर पूर्तता अहवाल सादर करावा.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी

मुंबई उपनगर जिल्हा करीता

पीएमएस. ३१९२.

6/3/1992

ISSUED ON

तिनप्राप्ति (३)

Scanned by CamScanner